सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
उपवनसंरक्षक,पुणे वन विभाग,पुणे
सेनापती बापट मार्ग,पुणे ४११ ००४
दूनध्वनी - ०२० २५६६ ०५९३
ई-मेल - dycfpune@gmail.com

क्रमांक:-ब/कक्ष-४-२/जमीन/ ५५३ /२०२०-२१ दिनांक:- १४/०१/ २०२१
पत्र
प्रति,

कार्यकारी अभियंता,
बांधकाम विभाग (उत्तर)जि.प. पुणे.

विषय:- वन प्रस्ताव क्र. **FP/MH/ROAD/118687/2020.)**
मौजे कुसगांव बु. ते गेव्हडे (आपटी) Odr ६२ यांना जोडणारा रस्ता तयार करणे कामी मौजे कुसंगाव बु. व गेव्हडे (आपटी) मधील ०.९६३ हे. वन क्षेत्र उपलब्ध होणे कामी वन(संवर्धन) कायदा,१९८० अंतर्गत वन प्रस्ताव बाबत.

संदर्भ:- आपणाकडील पत्र क्रं.जा.क्र./परस्ताव/मावळ/१००/२०२०-२१,दि.०९.०२.२०२१.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी आपलेकडील संदर्भिय पत्रान्वये वन(संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गतचा प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेला होता. सदर प्रस्तावाची या कार्यालयाकडून छाननी केली असता त्यामध्ये खालीलप्रमाणे त्रृटी दिसून येत आहेत.

१. प्रस्तावित रस्त्याचे कामाचे सुरूवातीचे ठिकाण व शेवटचे ठिकाण नमुद करण्यात आलेले नाही.
२. प्रस्तावित रस्त्याचे कामामध्ये सुरूवातीपासून ते शेवट पर्यंत बाधीत होणारे राखीव वन व खाजगी वनक्षेत्र दर्शविण्यात आलेले नाही.
३. प्रस्तावित रस्त्याचे कामामध्ये समाविष्ठ वनेत्तर क्षेत्र दर्शविण्यात आलेले नाही.
४. प्रस्तावामध्ये जोडलेल्या नकाशामध्ये वरीलप्रमाणे नमूद केलेनुसार क्षेत्र तपशील सादर करून त्यानुसार राखीव वन / खाजगी वन / वनेतर क्षेत्र वेगवेगळ्या रंगाने दर्शविण्यात यावेत.
५. प्रस्तावामध्ये बाधीत होत असलेल्या क्षेत्राची खात्री करणेसाठी वन व वनेत्तर क्षेत्राचे सर्व्हे नंबर चे ७/१२ अभिलेख, गटाचे ७/१२ उतारे, गटस्किम उतारे, आकारबंद, सर्व्हे नंबरचा, एकत्रीकरण नकाशा, वाडीविभाजनानंतरचे नकाशे इ. कागदपत्रे सोबत जोडलेले नाही.
६. प्रस्तावा सोबत जोडलेले नकाशे हे केंद्र शासनाचे पत्र क्र. फ-११-९/९८-एफसी, दि. ०८/०७/२०११ मधील मार्गदर्शक सुचनेनुसार तयार केलेले नाहीत. तरी सदर मार्गदर्शक सुचनेनुसार नकाशे सादर करावेत.
७. प्रस्तावित कामाबाबत वरील प्रमाणे क्षेत्र सन १९८० पुर्वीचे टोपोशिट मध्ये दर्शवून सादर करण्यात यावे.
८. प्रस्तावामध्ये रस्त्याचे मंजूर अंदाजपत्रकाची तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेचे आदेश जोडण्यात आलेले नाहीत.
९. वळतीकरण करावयाच्या वन व वनेतर क्षेत्रामधील प्रस्तावित कामाबाबत परिपुर्ण L Section व Cross Section हे प्रस्तावित कामामध्ये नमुद रूंदी व लांबी नुसार असणे आवश्यक. तसेच अस्तित्वातील कल्वर्ट / मोऱ्याचे बाबत व नवीन करण्यात येणारे कल्वर्ट / मोऱ्याचे बाबत L Section व Cross Section प्रस्तावामध्ये जोडलेले नाहीत, तसेच त्यानुसार साखळी क्रमांक नुद करण्यात आलेले नाही. प्रस्तावित कामाबाबत वनक्षेत्र व वनेत्तर क्षेत्र वेगवेगळया रंगाने रंगवून त्यामध्ये साखळी क्रमांक नमुद करण्यात यावेत.
१०. फॉर्म A मधील पार्ट १ मधील माहिती अपुर्ण भरलेली असून, त्यामध्ये Area Statement मधील माहिती अपुर्ण भरलेली आहे.
११. सदरचे प्रकल्पांतर्गत प्रस्तावीत कामाबाबत वनक्षेत्र १.०० हे.पेक्षा जास्त वळतीकरण होणार असल्यास वनक्षेत्राचे बदल्यात पर्यायी वनिकरणाबाबतचे क्षेत्राबाबतचा तपशील व दस्ताऐवज सादर करण्यात यावा.
अथवा, प्रस्तावीत कामाबाबत वनक्षेत्र १.०० हे. पेक्षा कमी वळतीकरण होणार असल्यास वनक्षेत्रपाल, वडगाव यांचे कार्यालयाशी संपर्क साधून या प्रकल्पाअंतर्गत Degreeded Forest क्षेत्रावर १ हेक्टर वनीकरण करावयाची Afforestation Scheme व त्याची KML, Shape File ची CD व विहिती नमुन्यातील नकाशा दर्शविणे आवश्यक असुन तो प्रस्तावामध्ये समाविष्ठ करण्यात यावा.

कृ.मा.पहा.

१२. प्रस्तावातील काम हे नजीकचे अभयारण्यापासून हवाई अंतराने (Arial Distance) ने किती कि.मी.आहे हे दर्शविले नाही व त्याबाबतचा नकाशा सादर केला नाही.

१३. प्रस्तावासोबत खालील कागदपत्रे मराठी व आंग्ल भाषेमध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे.

   १. ७/१२ अभिलेख बाधीत होणाऱ्या राखीव व इतर वनक्षेत्राचे.
   २. नमुद क्षेत्रासंबंधी चालु बाजारभाव मुल्य (Ready Recknor)
   ३. मा.जिल्हाधिकारी यांचे आंग्ल भाषेमधील FRA 2006 चे प्रमाणपत्र.

१४. वळतीकरण करावयाचे वनक्षेत्र व वनेत्तर क्षेत्र यांचे GPS Quardinate दर्शविणारे प्रपत्र.

१५. अनुसूचीत जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) कायदा २००६ नियम २००८ अन्वये जिल्हाधिकारी यांचे विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र बाबत महाराष्ट्र शासन निर्णय क्रं.FLD-2015/C.R.192/F-10,Dt.15.01.2019 चे मार्गदर्शक सूचना नुसार हमीपत्र सादर करण्यात यावे.

१६. प्रोजेक्ट नोट मध्ये क्षेत्र तपशील हा वर नमुद केल्याप्रमाणे दर्शविणे आवश्यक.

१७. प्रस्तावित कामाचे संदर्भात जवळचे अभयारण्यापासून अंतर दर्शविणारा नकाशा जोडण्यात यावा.

१८. सदरचे कामामधील वनेत्तर क्षेत्रामध्ये कामाबाबत भू-संपादन करावयाचे असल्यास त्यासंदर्भातील भू-संपादनाबाबतचे नोटिफिकेशन सोबत सादर करण्यात यावे.

वरीलप्रमाणे त्रुटींची पुर्तता करून प्रस्ताव ७ प्रतीत तात्काळ या कार्यालयास फेरसादर करावा. सदरचा प्रस्ताव या कार्यालयास सादर होण्यास होणाऱ्या विलंबास तसेच केंद्र शासनाचे परवानगीसाठी वरीष्ठ कार्यालयास पाठविण्यास विलंब झालेस सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी.

सोबत :- प्रस्तावाचे ५ प्रती.

(राहुल पाटील,भा.व.से.)
उपवनसंरक्षक,
पुणे वनविभाग,पुणे.

प्रत :- सहा.वनसंरक्षक (ववसं) पुणे यांचेकडे वरीलप्रमाणे माहिती व पुढील उचित कार्यवाहीसाठी.

प्रत :-वनपरिक्षेत्र अधिकारी,वडगाव मावळ यांना वरीलप्रमाणे माहिती व पुढील उचित कार्यवाहीसाठी.

२.०० त्यांना कळविण्यात येते कि, प्रकल्प यंत्रणेनेचे प्रतिनिधींसोबत स्थळपाहणी करून बाधित होणा-या वन क्षेत्रातील वृक्षांची मोजदाद, प्रजातीनिहाय, वेढीनिहाय माहिती तसेच वृक्षतोडीचे अंदाजपत्रक व विहित नमुन्यातील स्थळपाहणी अहवाल तसेच प्रस्तावित ग.नं.चा वैधानिक दर्जा व त्यामध्ये कोणती न्यायालयीन प्रक्रिया चालू आहे अथवा कसे याबाबतची माहिती सादर करण्यात यावी. तसेच वनभंग झाला आहे किंवा कसे याबाबत सविस्तर अवहवाल या कार्यालयास सादर करावा.

तसेच जर प्रस्तावीत कामाबाबत वनक्षेत्र १.०० हे. पेक्षा कमी वळतीकरण होणार असल्यास सदरचे प्रकल्पाअंतर्गत Degreeded Forest क्षेत्रावर १ हेक्टर वनीकरण करावयाची Afforestation Scheme व त्याची KML, Shape File ची CD व विहिती नमुन्यातील नकाशासह या कार्यालयास सादर करण्यात यावे.